# २६ समास

काटकसर हे सुज्ञ, विचारी माणसाचे लक्षण आहे. व्यवहारात माणसे काटकसरीने वागतात. भाषा हे ही व्यवहाराचे अंग आहे. भाषेचा उपयोग करताना आपण शब्दांची काटकसर करतो. दोन किंवा अधिक शब्दांऐवजी आपण एकाच शब्दाचा उपयोग करतो. उदा. 'चंद्राचा उदय' असे न म्हणता आपण 'चंद्रोदय' असे म्हणतो. तर काहीवेळा वर्ण एकमेकात न मिसळता काही शब्द गाळून सुटसुटीत असे जोडशब्द बनवितो. **उदा.** 'पोळीसाठी पाट' असे न म्हणता आपण 'पोळपाट' असे म्हणतो. 'बटाटे घालून तयार केलेला वडा' असे न म्हणता आपण 'बटाटेवडा' असे म्हणतो. शब्दांच्या अशा एकत्रीकरणास **समास** असे म्हणतात.

'सम्+आस' या संस्कृत धातूपासून 'समास' हा शब्द तयार झाला असून त्याचा अर्थ 'एकत्र करणे' असा आहे. समासात एक जोडशब्द तयार करताना त्या शब्दांतील परस्परसंबंध दाखविताना त्यातील विभक्तिप्रत्यय किंवा शब्द आपण गाळतो. समास हीदेखील भाषेतील काटकसर आहे.

शब्दांच्या एकत्रीकरणाने जो एक जोडशब्द तयार होतो, त्याला **सामासिक शब्द** असे म्हणतात. हा सामासिक शब्द कोणत्या शब्दांपासून तयार झाला आहे, हे स्पष्ट करण्यासाठी आपण फोड करून सांगतो. फोड करून दाखविण्याच्या पद्धतीला **विग्रह** असे म्हणतात. विग्रह म्हणजे कमीत कमी शब्दांत सामासिक शब्दाचे केलेले स्पष्टीकरण होय. उदा. 'वनभोजन' हा सामासिक शब्द असून 'वनातील भोजन' हा त्याचा विग्रह होय.

**विग्रह म्हणजे सामासिक शब्दाचे कमीतकमी शब्दात केलेले स्पष्टीकरण**

समासाच्या मूलभूत घटकांची (पदांची) संख्या दोन असते. या दोन घटकांच्या एकमेकांशी असलेल्या संबंधावरूनच समासाच्या जाती ठरविल्या गेल्या आहेत.

## समासाचे प्रकार

**समासात कमीत कमी दोन शब्द किंवा पदे एकत्र येतात. दोन शब्दांपैकी कोणत्या पदाला वाक्यात अधिक महत्त्व, म्हणजे कोणत्या पदाबद्दल आपल्याला अधिक बोलावयाचे असते, यावरून समासाचे प्रकार ठरविण्यात आलेले आहेत; ते असे.**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | पहिले पद मुख्य | दुसरे गौण | अव्ययीभाव समास |
| २) | दुसरे पद मुख्य | पहिले गौण | तत्पुरुष समास |
| ३) | दोन्ही पदे मुख्य | - | द्वंद्व समास |
| ४) | दोन्ही पदे महत्त्वाची नसणे (गौण) | - | बहुव्रीही समास |

या प्रत्येक जातीपैकी कोणत्याच जातीत न बसणाऱ्या समासाला केवलसमास म्हणतात. जो प्रचलित भाषेत अभावाने आढळतो.

## अव्ययीभाव समास (पूर्वपद प्रधान)

जेव्हा समासातील पहिले पद बहुधा अव्यय असून ते महत्त्वाचे असते व या सामासिक शब्दाचा वापर क्रियाविशेषणासारखा केलेला असतो, तेव्हा अव्ययीभाव समास होतो.

उदा.
- आजन्म - जन्मापासून/जन्मभर
- प्रतिदिन - प्रत्येक दिवशी
- आमरण - मरणापर्यंत
- यथाशक्ती - शक्तीप्रमाणे / शक्तीला अनुसरून
- प्रतिक्षण - प्रत्येक क्षणाला
- बिनतक्रार - तक्रारीवाचून/तक्रारीशिवाय

- वरील उदाहरणांत 'आ, यथा, प्रति' हे **संस्कृत**मधील उपसर्ग आहेत. तर **बिन** हा **फारसी** उपसर्ग आहे. संस्कृतमध्ये उपसर्गांना अव्ययेच मानतात. हे उपसर्ग प्रारंभी लागून बनलेले वरील शब्द हे सामासिक शब्द आहेत.
- त्यांचा वर दिल्याप्रमाणे विग्रह करताना या उपसर्गांच्या अर्थांना या सामासिक शब्दांत अधिक महत्त्व आहे, म्हणून या समासाला **प्रथमपदप्रधान समास** असे म्हणतात.
- शिवाय तयार झालेला सामासिक शब्द हे **क्रियाविशेषण अव्यय** आहे; म्हणून त्याला **अव्ययीभाव समास** असे म्हणतात.
- संस्कृतप्रमाणे **फारसी** भाषेतील उपसर्ग प्रारंभी येऊन अव्ययीभाव समासाची मराठीत पुष्कळ उदाहरणे आहेत.

  उदा. **दररोज, हरघडी, बिनधोक, बेलाशक, गैरशिस्त, गैरवाजवी, बरहुकूम, दरमजल, बिनशर्त, बेमालूम, गैरहजर**.
- मराठीत शब्दांची द्विरुक्ती होऊन बनलेले जोडशब्द क्रियाविशेषणाप्रमाणे वापरले जातात.

  उदा. **गावोगाव, जागोजाग, गल्लोगल्ली, पदोपदी, घरोघर, दारोदार, रस्तोरस्ती, दिवसेंदिवस, पावलोपावली**
- या शब्दांत संस्कृत किंवा फारसी अव्ययीभाव समासाप्रमाणे **प्रारंभीचा शब्द अव्यय नाही.**
- काही शब्दांतील प्रथमपदाच्या अंती **'ओ' कार** आलेला आहे,
- तरी एकंदरीत त्याचे स्वरूप **क्रियाविशेषण अव्ययाचे** असल्यामुळे ही मराठीतील अव्ययीभाव समासाची उदाहरणे आहेत.

**लक्षात ठेवा :**

**घरोघर, यथाकाल, प्रतिदिन यांसारखे समास घरोघरी, यथाकाली, प्रतिदिनी** याप्रमाणे विकल्पाने सप्तमी रूपातही आढळतात. तेव्हाही ते अव्ययेच असतात.

---

## तत्पुरुष समास (उत्तरपद प्रधान)

**ज्या समासातील दुसरे पद महत्त्वाचे असते व अर्थाच्या दृष्टीने गाळलेला शब्द किंवा विभक्तिप्रत्यय विग्रह करताना घालावा लागतो. त्यास तत्पुरुष समास असे म्हणतात.**

उदा.
- **तोंडपाठ** (तोंडाने पाठ),
- **महादेव** (महान असा देव),
- **कंबरपट्टा** (कंबरेसाठी पट्टा),
- **अनिष्ट** (नाही इष्ट ते).

उत्तरपदप्रधान अशा तत्पुरुष समासाचे दोन प्रकार आहेत.

१) व्यधिकरण तत्पुरुष
↓
घटकपदांची विभक्ती (पूर्वपद, उत्तरपद दोन्हीची) भिन्न भिन्न असते
↓
विभक्ती तत्पुरुष | नञ् तत्पुरुष | उपपद तत्पुरुष

२) समानाधिकरण तत्पुरुष
↓
दोन्ही पदांची विभक्ती एकच असते.
↓
कर्मधारय

- समानाधिकरण तत्पुरुषालाच **कर्मधारय** म्हणतात.
- पूर्वपदाच्या विभक्तिप्रत्ययाचा लोप होत नाही त्यांना **अलुक् समास** म्हणतात.

**उदा. युधिष्ठिर, तोंडीलावणे**

- तत्पुरुष समासातील दोन्ही पदे कधी-कधी विग्रहाच्या वेळी एकाच विभक्तीत असतात.

उदा. **काळमांजर** (काळे असे मांजर) यास **समानाधिकरण तत्पुरुष समास** असे म्हणतात.

- कधी-कधी दोन्ही पदे भिन्न अशा विभक्तीत असतात.

उदा. - **देवपूजा** (देवाची पूजा) या प्रकारास **व्यधिकरण तत्पुरुष** असे म्हणतात.

**तत्पुरुष समासाचे प्रकार पाहू या.**

**(अ) विभक्ती-तत्पुरुष समास**

- ज्या तत्पुरुष समासात कोणत्यातरी विभक्तीचा किंवा विभक्तीचा अर्थ व्यक्त करणाऱ्या शब्दयोगी अव्ययाच लोप करून दोन्ही पदे जोडली जातात. त्यास **विभक्ती-तत्पुरुष समास** असे म्हणतात.
- या समासाचा विग्रह करताना एका पदाचा दुसऱ्या पदाशी असलेला संबंध ज्या विभक्तिप्रत्ययाने दाखवित जातो, त्याच विभक्तीचे नाव त्या समासाला दिले जाते.
- **या समासाचे विभक्तीनुसार पोटप्रकार पुढील तक्त्यात दिले आहेत. अर्थात विग्रहाला अनुसरू समासाची नावे बदलणे शक्य आहे.**

**उदा. गावदेवी - (गावची देवी - षष्ठी तत्पुरुष समास), (गावातील देवी-सप्तमी तत्पुरुष.)**

**ज्ञानयज्ञ - (ज्ञानाचा यज्ञ - षष्ठी तत्पुरुष समास), (ज्ञानासाठी यज्ञ - चतुर्थी तत्पुरुष समास)**

**चोरभय - (चोरापासून भय - पंचमी तत्पुरुष), (चोराचे भय- षष्ठी तत्पुरुष).**

| सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव | आणखी उदाहरणे |
|---|---|---|---|
| दुःखप्राप्त | दुःखाला प्राप्त | द्वितीया तत्पुरुष | कृष्णाश्रित, देशगत. |
| भक्तिवश | भक्तीने वश | तृतीया तत्पुरुष | तोंडपाठ, दयार्द्र, गुणहीन, ईश्वरनिर्मित, बुद्धिजड, उपासमार, कष्टसाध्य. |
| क्रीडांगण | क्रीडेसाठी अंगण | चतुर्थी तत्पुरुष | गायरान, पोळपाट, वाटखर्च, मेंढवाडा, पूजाद्रव्य, बाइलवेडा, व्याहीभोजन, कृष्णार्पण, विद्यालय, कमरपट्टा |
| ऋणमुक्त | ऋणातून मुक्त | पंचमी तत्पुरुष | सेनानिवृत्त, गर्भश्रीमंत, जातिभ्रष्ट, रोगमुक्त, धर्मभ्रष्ट, वडिलोपार्जित, पदच्युत |
| राजपुत्र | राजाचा पुत्र | षष्ठी तत्पुरुष | चोरभय, जन्मखोड, देवपूजा, राजवाडा, घोडदौड, लक्ष्मीकांत, धर्मवेड, आंबराई, भूपती, विद्याभ्यास, ज्ञानयज्ञ, पायरव, गणपती, धर्मबुद्धी, देशभक्ती, कालवैभव |
| घरजावई | घरातील जावई | सप्तमी तत्पुरुष | स्वर्गवास, पोटशूळ, वनभोजन, कूपमंडूक, घरधंदा, कलाकुशल, पाणकोंबडा, विद्यापारंगत, कलाचातुर्य |

### (आ) अलुक् तत्पुरुष समास

**पुढील सामासिक शब्द पाहा.**

- अग्रेसर, युधिष्ठिर, पंकेरूह, सरसिज या शब्दांच्या पहिल्या पदातील 'अग्रे, युधि, पंके, सरसि' ही त्या-त्या शब्दांची संस्कृतमधील सप्तमीची रूपे न गाळता तशीच राहिली आहेत. (लुक् - लोप होणे. अलुक् - लोप न होणारे)
- म्हणून 'ज्या विभक्ती-तत्पुरुष समासात पूर्वपदाच्या विभक्तिप्रत्ययाचा लोप होत नाही, त्यास **अलुक् तत्पुरुष समास** असे म्हणतात.
- तोंडीलावणे हे या समासाचे मराठी उदाहरण होय.

समासाची अजून काही **उदाहरणे** - अग्रेसर, दीनानाथ, खिसेकापू, पहारेकरी,

### (इ) उपपद तत्पुरुष समास

**पुढील काव्यपंक्ती पाहा.**

१) शैवाले गुंतले तरि पंकज हे शोभते ।

२) गडद निळे, गडद निळे, जलद भरुनि आले ।

वरील कवितेच्या ओळींतील पुढील शब्दांची फोड आपण कशी करतो ते पाहा.

१) पंकज - पंकात (चिखलात) जन्मणारे ते. २) जलद - जल देणारे.

- या समासातील दुसरे पद प्रधान आहे, म्हणून हा तत्पुरुष समासाचा प्रकार आहे.
- शिवाय यांतील दुसरी पदे धातुसाधिते किंवा कृदन्ते आहेत; व ही कृदन्ते अशी आहेत की, त्यांचा वाक्यात स्वतंत्रपणे उपयोग करता येत नाही.
- धातुसाधित ज्या धातूचे साधित रूप म्हणून येते तो धातू या समासाच्या विग्रहात वर्तमानकाळी तृतीय पुरुषात प्रकट होतो.

उदा. नाकर्ता - ना कर्ता, अनर्थ - न अर्थ

- अशा समासास उपपद किंवा कृदन्त तत्पुरुष समास असे म्हणतात.

उदा - **ग्रंथकार, कुंभकार, पांथस्थ, मार्गस्थ, द्विज, विहग, शेषशायी.**

यातील **कार** (करणारा), **स्थ** (राहणारा), **ज** (जन्मणारा), **ग** (जाणारा), **शायी** (निजणारा) ही त्या-त्या संस्कृत धातूपासून झालेली रूपे असून सामासिक शब्दांशिवाय त्यांचा अन्यत्र स्वतंत्रपणे उपयोग होत नाही. या समासाची आणखी काही उदाहरणे पाहा.

**देशस्थ, मनुज, नृप, सुखद, पयोद, खग, नग, सुज्ञ, कृतघ्न, कृतज्ञ, ग्रंथकार, गृहस्थ.**

**मराठी शब्दांची उदाहरणे पाहा.**

**शेतकरी, कामकरी, आगलाव्या, भाजीविक्या, वाटसरू.**

- पंकेरूह, सरसिज यांसारखे संस्कृत सामासिक शब्द व मळेकरी, पहारेकरी, पाखरेविक्या, गळेकापू यांसारखे मराठी सामासिक शब्द हे अलुक् व उपपद तत्पुरुष अशा दोन्ही प्रकारची उदाहरणे आहेत.
- यातील पहिल्या पदातील विभक्तीचा लोप झाला नाही, म्हणून ते अलुक् व त्यांतील दुसरी पदे धातुसाधिते आहेत, म्हणून ते **उपपद तत्पुरुष**. अशा समासांना **उभय-तत्पुरुष** असेही म्हणतात.

---

### (ई) नञ् तत्पुरुष समास

**पुढील वाक्ये पाहा.**

१) माझा निबंध अपुरा राहिला.

२) अजामिळ हा नास्तिक होता.

- या वाक्यातील रंगीत शब्द लक्षपूर्वक पाहा. यातील **दुसरी पदे** महत्त्वाची आहेत, म्हणून ती तत्पुरुष समासाची उदाहरणे आहेत.
- मात्र अशा पदातील पहिली पदे **'अ, अन्, न, ना, बे, नि, गैर'** यांसारखी अभाव किंवा निषेध दर्शविणारी आहेत.
- अशा रीतीने ज्या तत्पुरुष समासातील पहिले पद नकारार्थी असते, त्यास **नञ् तत्पुरुष समास** असे म्हणतात.
- आणखी उदाहरणे पाहू.

अयोग्य (योग्य नव्हे ते), अनादर (आदर नसलेला), नापसंत (पसंत नसलेला), **नाकर्ता, अधर्म, अनर्थ अनिष्ट, अनाचार, अन्याय, अहिंसा, निरोगी, नाइलाज, नाउमेद, बेडर, गैरहजर.**

## (उ) कर्मधारय समास

ज्या तत्पुरुष समासातील दोन्ही पदे एकाच विभक्तीत, प्रथमा विभक्तीत असतात, तेव्हा त्यास **कर्मधारय समास** असे म्हणतात.

**उदा.** ▸ **महादेव** (महान असा देव), ▸ **घनश्याम** (घनासारखा श्याम).

▸ यातील पहिले पद **विशेषण** असून दुसरे पद **नाम** असते.

▸ यांतील दोन्ही पदांतील संबंध **विशेषण-विशेष्य** किंवा **उपमान-उपमेय** अशा स्वरूपाचा असतो.

**उदा.** **रक्तचंदन** (रक्तासारखे चंदन), **मुखकमल** (मुख हेच कमल), **कमलनयन** (कमळासारखे नयन).

**यातील पोटप्रकार पुढीलप्रमाणे.**

**(१) विशेषण-पूर्वपद -** सामासिक शब्दातील पहिले पद (पूर्व) विशेषण असते.

**उदा. -** रक्तचंदन, नीलकमल, पीतांबर (पिवळे असे वस्त्र), महादेव, तांबडीमाती, साडेतीन - साडे (- सार्ध, अर्ध्यासह) तीन

**(२) विशेषण-उत्तरपद -** सामासिक शब्दातील दुसरे पद विशेषण असते.

**उदा.-** घननील (निळा असा घन), पुरुषोत्तम (उत्तम असा पुरुष), भाषांतर (अन्य भाषा), वेशांतर (अन्यवेश), रामदयाळ - (दयाळू असा राम)

**(३) विशेषण-उभयपद -** सामासिक शब्दातील दोन्ही पदे विशेषणे असतात.

**उदा.-** पांढराशुभ्र, श्यामसुंदर, लालभडक, हिरवागार, काळाभोर.

**(४) उपमान-पूर्वपद -** सामासिक शब्दातील पहिले पद (पूर्व) उपमान असते.

**उदा. -** कमलनयन/कमलनेत्र (कमळासारखे डोळे), मेघश्याम (मेघासारखा काळा), चंद्रमुख (चंद्रासारखे मुख), साखरलिंबू - (साखरेसारखे लिंबू)

**(५) उपमान-उत्तरपद -** सामासिक शब्दातील दुसरे पद (उत्तर) उपमान असते.

**उदा.-** मुखचंद्र, चरणकमल, नरसिंह, (सिंहासारखा नर), मुखकमल, पुरुषसिंह

**(६) रूपक-उभयपद -** सामासिक शब्दातील दोन्ही (उभय) पदे एकरूप असतात.

**उदा.-** विद्याधन (विद्या हेच धन), काव्यामृत (काव्यरूपी अमृत), भवसागर, विद्युल्लता, चरणकमल.

**लक्षात ठेवा :**

उपमान-उत्तरपद व रूपक उभयपद या प्रकारची उदाहरणे बहुतेक सारखी आहेत. म्हणजे एकाच उदाहरणाचा दोन्ही पद्धतीने विग्रह करता येतो.

**उदा.** १) कमलासारखे मुख - मुखकमल - उपमान उत्तरपद

**स्पष्टीकरण :** कमलासारखे मुख - मुखाची कमलाशी तुलना केली आहे. म्हणून उपमान उत्तरपद.

२) मुख हेच कमल - मुखकमल - रूपक उभयपद

**स्पष्टीकरण :** मुख हेच कमल - मुखावर कमलत्वाचा आरोप (रूपक) म्हणून रूपक उभयपद

अर्थात असा समास कोणत्या प्रकाराने सोडवायचा हे तो समास ज्या संदर्भात आला असेल त्यावर अवलंबून असते. (स्वतंत्रपणे उदाहरण विचारल्यास दोन्ही प्रकारे सोडविणे ग्राह्य/योग्य समजायला हवे.)

### ऊ) द्विगू समास

**पुढील वाक्ये वाचा.**

१) रामचंद्र पंचवटीत राहत होते. २) नवरात्रात देवीचा उत्सव असतो.

३) चातुर्मासात व्रते करतात. ४) अशी माणसे त्रिभुवनात नसणार.

वरील वाक्यांतील रंगीत अक्षरांत छापलेले सामासिक शब्द पाहा. त्यांचा विग्रह पुढीलप्रमाणे.

१) **पंचवटी** (पाच वडांचा समूह), २) **नवरात्र** (नऊ रात्रींचा समूह),

३) **चातुर्मास** (चार मासांचा समूह), ४) **त्रिभुवन** (तीन भुवनांचा समूह).

**या विग्रहावरून तुमच्या लक्षात आले असेल, की**

- या प्रत्येक सामासिक शब्दातील दुसरे पद महत्त्वाचे आहे. या पदांचा परस्परसंबंध विशेषण, विशेष्य असा आहे म्हणजे हा कर्मधारय समासाचाच प्रकार आहे.
- या सामासिक शब्दांतील पहिली पदे संख्याविशेषणे आहेत व सामासिक शब्दांवरून एक समूह सुचविला जातो.
- अशा प्रकारे ज्या कर्मधारय समासातील पहिले पद संख्याविशेषण असते व त्या सामासिक शब्दावरून एका समुच्चयाचा अर्थ दर्शविला जातो, तेव्हा त्यास **द्विगू समास** असे म्हणतात.
- हा समास नेहमी एकवचनात असतो.

या समासाची आणखी काही उदाहरणे - सप्ताह, त्रिदल, पंचपाळे, चौघडी, त्रैलोक्य, बारभाई, पंचारती.

द्विगू समासाला **'संख्यापूर्वपद कर्मधारय समास'** असेही म्हणतात.

**लक्षात ठेवा :**

चारपाच या सामासिक शब्दात पूर्वपद संख्यावाचक असले तरी ते पाचचे विशेषण नाही. म्हणून हा समास द्विगू न होता 'चारपाच- चार किंवा पाच' असा विग्रह होऊन वैकल्पिक द्वंद्व होतो.

### (ए) मध्यमपदलोपी समास

**पुढील सामासिक शब्द पाहा.**

कांदेपोहे, साखरभात, चुलतसासरा.

**या सामासिक शब्दांचा विग्रह अनुक्रमे पुढीलप्रमाणे आहे.**

कांदे घालून केलेले पोहे - कांदेपोहे

साखर घालून केलेला भात - साखरभात

नवऱ्याचा चुलता या नात्याने सासरा - चुलतसासरा

- अशा सामासिक शब्दातील पहिल्या पदाचा दुसऱ्या पदाशी संबंध दाखविणारी मधली काही पदे लोप करावी लागतात, म्हणून या समासाला **मध्यमपदलोपी समास** असे म्हणतात.
- या सामासिक शब्दाचा विग्रह करताना युक्त, द्वारा, पुरता, असलेला अशांसारखी गाळली गेलेली पदे घालावी लागतात; म्हणून या समासाला **लुप्तपद कर्मधारय समास** असेही म्हणतात.

**या समासाची आणखी काही उदाहरणे पाहू.**

डाळवांगे (वांगेयुक्त डाळ), पुरणपोळी (पुरण भरून तयार केलेली पोळी), लंगोटीमित्र (लंगोटी घालत असल्यापासूनचा मित्र), भोजनभाऊ (भोजनापुरता भाऊ), घोडेस्वार (घोडा असलेला स्वार), मावसभाऊ (मावशीचा मुलगा या नात्याने झालेला भाऊ), बालमित्र, गुळांबा, मामेभाऊ, बटाटेभात, नातसून इत्यादी.

### द्वंद्व समास

**ज्या समासातील दोन्ही पदे अर्थदृष्ट्या प्रधान (उभयपदप्रधान) म्हणजे समान दर्जाची असतात, त्यास द्वंद्व समास असे म्हणतात. 'आणि, व, अथवा, किंवा' या उभयान्वयी अव्ययांनी ही पदे जोडलेली असतात.**

उभयपदप्रधान म्हणजे ज्यात दोन्ही घटकांचा अर्थ मुख्यतः सारखाच महत्त्वाचा असतो.

**उदा.** रामलक्ष्मण (राम आणि लक्ष्मण),

पापपुण्य (पाप किंवा पुण्य),

विटीदांडू (विटी आणि दांडू)

**द्वंद्व समासाचे तीन प्रकार आहेत.**

अ) इतरेतर द्वंद्व समास,

आ) वैकल्पिक द्वंद्व समास,

इ) समाहार द्वंद्व समास.

#### (अ) इतरेतर द्वंद्व समास

ज्या समासाचा विग्रह करताना 'आणि' 'व' या समुच्चयबोधक उभयान्वयी अव्ययांचा उपयोग करावा लागतो, त्यास **इतरेतर द्वंद्व समास** असे म्हणतात.

सर्व घटकांना समान महत्त्व असते. म्हणूनच इतरेतरद्वंद्व हा समास अनेकवचनी असतो.

**उदा.** आईबाप (आई आणि बाप), हरिहर (हरि आणि हर), तसेच स्त्रीपुरुष, अहिनकुल, एकवीस, कृष्णार्जुन, बहीणभाऊ, मायलेकरे, ब्रह्मविष्णुमहेश, विटीदांडू, कुलुपकिल्ली.

#### (आ) वैकल्पिक द्वंद्व समास

ज्या समासाचा विग्रह करताना 'किंवा' 'अथवा', 'वा' या विकल्प दाखविणाऱ्या उभयान्वयी अव्ययांचा उपयोग करावा लागतो, त्यास **वैकल्पिक द्वंद्व समास** असे म्हणतात.

प्रायः दोन्ही पदे विरुद्ध अर्थाची असतात.

**उदा.** खरेखोटे (खरे किंवा खोटे), तीनचार (तीन किंवा चार), बरेवाईट (बरे किंवा वाईट), पासनापास (पास किंवा नापास). तसेच पापपुण्य, धर्माधर्म, न्यायान्याय, सत्यासत्य.

#### (इ) समाहार द्वंद्व समास

ज्या समासातील पदाचा विग्रह करताना त्यातील पदांच्या अर्थाशिवाय त्याच जातीच्या इतर पदार्थांचाही त्यात समावेश म्हणजेच समाहार केलेला असतो, त्यास **समाहार द्वंद्व समास** असे म्हणतात. उदा.- मीठभाकर (मीठ, भाकरी व साधे खाद्यपदार्थ), चहापाणी (चहा, पाणी व फराळाचे इतर पदार्थ), भाजीपाला (भाजी, पाला, व मिरची, कोथिंबीर यांसारख्या इतर वस्तू), अंथरूणपांघरूण (अंथरण्यासाठी व पांघरण्यासाठी लागणाऱ्या वस्तू व इतर कपडे)

तसेच बाजारहाट, पालापाचोळा, केरकचरा, कपडालत्ता, पानपत्रावळ, घरदार इत्यादी.

समासाच्या या प्रकारात समासात आलेल्या आणि त्या जातीच्या इतर वस्तूंच्या समुदायास महत्त्व असते, म्हणून हा समास एकवचनी असतो.

**लक्षात ठेवा :**

कागदबिगद, शेजारीपाजारी यांसारखे प्रायः अर्थहीन (उत्तरपदाला स्वतंत्र अर्थ नसलेला शब्द) घटकांनी युक्त शब्द समास नाहीत. ते अभ्यस्तशब्द होत. उदा. खाणाखुणा, ओळखपाळख.

## ▶▶ बहुव्रीही समास

'बहुव्रीही' या शब्दाचा अर्थ 'शेतकरी' किंवा 'धान्यसंपन्न गृहस्थ' असा आहे. (बहु म्हणजे पुष्कळ, व्रीही म्हणजे तांदूळ, धान्य.) 'माझे कोकणातील मामा बहुव्रीही आहेत.' असा जेव्हा मी शब्दप्रयोग करतो, तेव्हा बहुव्रीही या जोडशब्दातील 'बहु' बद्दल मी बोलत नाही किंवा 'व्रीही' म्हणजे धान्याबद्दल मी बोलत नाही. पुष्कळ धान्य ज्यांच्याजवळ आहे अशा मामांच्याबद्दल मी बोलतो.

म्हणजे, **'बहुव्रीही' या सामासिक शब्दातील दोन्ही पदे महत्त्वाची नसून या दोन पदांशिवाय तिसऱ्याच पदाचा बोध होतो. हा सामासिक शब्द त्या तिसऱ्या पदाचे विशेषण असते.**

**पुढील वाक्ये वाचा.**

१) पार्वतीने नीलकंठास वरले.        २) समुद्राने पीतांबराला आपली कन्या दिली.

- ▶ वरील पहिल्या वाक्यात **'नीलकंठ'** हा सामासिक शब्द आहे. 'निळा आहे कंठ ज्याचा असा तो' असा त्याचा विग्रह करता येईल.
- ▶ अशा वेळी आपण 'कंठ' या पदाबद्दल प्राधान्याने बोलत असून 'निळा' हे त्याचे विशेषण होईल. इथे विशेषण-विशेष्य असा संबंध असल्यामुळे 'कर्मधारय' समास होईल.
- ▶ पण वरील वाक्यात निळा असा 'कंठ' म्हणजे 'गळा' या शब्दाबद्दल बोलायचे नसून 'निळा आहे कंठ ज्याचा' अशा 'शंकराबद्दल' बोलायचे आहे
- ▶ म्हणजे या सामासिक शब्दातील दोन्ही पदांवरून तिसऱ्या पदाचा बोध होत आहे व 'नीलकंठ' हे 'शंकर' या तिसऱ्याच नामाचे विशेषण आहे.
- ▶ **'पीतांबर'** या दुसऱ्या वाक्यातील शब्दाची तीच गोष्ट आहे.
- ▶ पीतांबर म्हणजे पीत (पिवळे) असे वस्त्र. यातील वस्त्राबद्दल फक्त बोलायचे असल्यास हा कर्मधारय समास होईल.
- ▶ पण 'समुद्राने पीतांबराला आपली मुलगी दिली.' या वाक्यातील पीतांबर – पिवळे वस्त्र असा अर्थ घ्यावयाचा नसून 'पीतांबर म्हणजे विष्णू' असा अर्थ घ्यावयाचा आहे
- ▶ म्हणजे पीतांबर या शब्दातील पीत व अंबर या दोन्ही शब्दांना इथे प्राधान्य नसून या दोन शब्दांवरून पिवळे आहे अंबर (वस्त्र) ज्याचे असा 'विष्णू' या तिसऱ्याच पदाला महत्त्व आहे आणि 'पीतांबर' हे 'विष्णू' या निराळ्याच पदाचे विशेषण आहे.
- ▶ सामासिक शब्दाच्या विग्रहावरून समासाचे नाव निश्चित करावे.
- ▶ म्हणून ज्या समासातील दोन्ही पदांना प्राधान्य नसून या दोन्हीवरून सूचित होणाऱ्या तिसऱ्याच पदाचा ज्या वेळी बोध होतो, त्यास 'बहुव्रीही समास' असे म्हणतात.

**बहुव्रीही समासाचे मुख्य चार प्रकार आहेत.**

अ) विभक्ती बहुव्रीही समास
आ) नञ् बहुव्रीही समास
इ) सह बहुव्रीही समास
ई) प्रादि बहुव्रीही समास

### (अ) विभक्ती बहुव्रीही समास

बहुव्रीही समासाचा विग्रह करताना शेवटी एक संबंधी सर्वनाम येते. जसे-

**लक्ष्मीकांत** - लक्ष्मीचा जो कान्त तो (षष्ठी)
**गजानन** - गजाचे आहे आनन ज्याला तो (चतुर्थी)
**जितेंद्रिय** - जित् (जिंकली) आहेत इंद्रिये ज्याने तो (तृतीया)

- वरील विग्रहात 'जो, ज्याला, ज्याने' अशी संबंधी सर्वनामांची रूपे आली आहेत.
- हे संबंधी सर्वनाम ज्या विभक्तीत असते, तिचेच नाव या समासाला देतात.
- म्हणून वरील तीनही सामासिक शब्द अनुक्रमे षष्ठी, चतुर्थी व तृतीया बहुव्रीही समासाची उदाहरणे आहेत.

**विभक्ती बहुव्रीहीचे प्रकार, त्यांचे विग्रह व उदाहरणे पुढील तक्त्यात दिली आहेत.**

**विभक्ती बहुव्रीहीचे प्रकार**

| प्रकार | सामासिक शब्द | विग्रह | इतर उदाहरणे |
|---|---|---|---|
| द्वितीया | प्राप्तधन | प्राप्त आहे धन ज्यास तो. | प्राप्तोदक, लब्धदृष्टी. |
| तृतीया | कृतकार्य | कृत (केले) आहे कार्य ज्याने तो. | जितेंद्रिय, कृतकृत्य, दत्तधन. |
| चतुर्थी | चौकोन | चार आहेत कोन ज्याला तो. | दशमुख, गजानन, दुतोंडा |
| पंचमी | निर्धन | निर्गत (गेले) आहे धन ज्याच्यापासून तो | निर्बल, गलितपर्ण, गतवैभव. |
| षष्ठी | लंबोदर | लंब (मोठे) आहे उदर ज्याचे तो | चक्रपाणि, चंद्रशेखर, मूषकवाहन, गरुडध्वज. |
| सप्तमी | भीमादी | भीम आदी आहे ज्यांत तो (पांडव) | कृपादी, नाक [नाही अक (दुःख) ज्यात तो म्हणजे स्वर्ग], पूर्णजल |

या विभक्ती बहुव्रीही समासाचे दोन प्रकार आहेत- अ) समानाधिकरण बहुव्रीही व आ) व्यधिकरण बहुव्रीही.

अ) बहुव्रीही समासाचा विग्रह करताना त्यातील दोन्ही पदे जेव्हा एकाच विभक्तीत असतात, तेव्हा त्याला **समानाधिकरण बहुव्रीही** असे म्हणतात.

उदा. भक्तप्रिय - भक्त आहे प्रिय ज्याला तो (देव).

**जितेंद्रिय** - जित (जिंकलेली) आहेत इंद्रिये ज्याने तो (मारुती).

आ) ज्या बहुव्रीही समासाचा विग्रह करताना यातील दोन्ही पदे जेव्हा भिन्न किंवा वेगवेगळ्या विभक्तींत असतात तेव्हा त्यास **व्यधिकरण बहुव्रीही** असे म्हणतात.

उदा. **पद्मनाभ** - पद्म आहे नाभीत (म्हणजे बेंबीत) ज्याच्या तो (विष्णू).

**चक्रपाणि** - चक्र आहे पाणित (म्हणजे हातात) ज्याच्या तो (विष्णू).

## (आ) नञ् बहुव्रीही समास

पुढील सामासिक शब्दांचा विग्रह पाहा.

**अनंत** - नाही अंत ज्याला तो (परमेश्वर).

**नीरस** - नाही रस ज्यात ते (काव्य).

वरील उदाहरणे बहुव्रीही समासाची आहेत, पण या सामासिक शब्दांचे पहिले पद नकारदर्शक आहे. बहुव्रीही समासाचे पहिले पद 'अ, अन, न, नि' असे नकारदर्शक असेल, तर त्यास **नञ्बहुव्रीही समास** असे म्हणतात.

उदा. अव्यय, अनेक, नपुंसक, अनादी, निर्धन, निःशब्द, निरोगी इत्यादी.

## (इ) सहबहुव्रीही समास

पुढील सामासिक शब्दांचा विग्रह पाहा.

**सादर** - आदराने सहित असा जो (नमस्कार).

**सहकुटुंब** - कुटुंबाने सहित असा जो (गृहस्थ).

वरील उदाहरणे बहुव्रीही समासाची आहेत, पण या सामासिक शब्दांचे पहिले पद 'सह' असे अव्यय आहे. मात्र हा सामासिक शब्द विशेषण असला, तर त्याला **सहबहुव्रीही समास** असे म्हणतात. (हा शब्द क्रियाविशेषणासारखा वापरला, तर अव्ययीभाव समास होतो.)

उदा. सनाथ, सहपरिवार, सुपुत्र, सफल, सरूप, सुवर्ण, सचैल, सानंद, सबल इत्यादी.

## (ई) प्रादिबहुव्रीही समास

बहुव्रीही समासाचे पहिले पद जर 'प्र, परा, अप, दुर, सु, वि' अशा उपसर्गांनी युक्त असेल, तर त्यास **प्रादिबहुव्रीही समास** असे म्हणतात. (प्रादि = प्र आदि उपसर्ग असलेले)

उदा. सुलोचना, निर्धन, विरागी, दुर्गुणी, प्राज्ञ

| | | |
|---|---|---|
| **समानाधिकरण बहुव्रीही** | • सामान्यतः पूर्वपद हे विशेषण व उत्तरपद विशेष्य<br>• विग्रहात दोन्ही पदे प्रथमा विभक्तीत | **उदा.** : कमलाक्षी<br>कमळासारखे आहेत (डोळे) अक्ष जिचे ती.<br>भक्तप्रिय, अष्टभुजा, तिमजली, अष्टपैलू |
| **व्यधिकरण बहुव्रीही** | • दोन्ही पदे नामे<br>• विग्रहात नेहमी भिन्न विभक्तीत | **उदा.** : चक्रपाणि *(संस्कृतनुसार)*<br>चक्र आहे पाणित (पाणि - हात) ज्याच्या तो - विष्णु<br>चंद्रमौली, पद्मनाभ. |
| **नञ् बहुव्रीही** | • पूर्वपद 'न' हे अभाववाचक म्हणून येते.<br>• नञ् तत्पुरुषाप्रमाणे स्वरापूर्वी 'अन्' व व्यंजनापूर्वी 'अ' असे रूपांतर होते. | **उदा.** : असंख्य<br>नाही संख्या ज्यांना ते, अनादि, अनंत |
| **सहबहुव्रीही** | • पूर्वपद 'सह' हे अव्यय किंवा 'सह'ऐवजी त्याचेच 'स' हे संक्षिप्त रूप येते. | **उदा.** : सहकुटुंब - कुटुंबासह<br>सत्वर - त्वरेसह<br>सफल |
| **प्रादिबहुव्रीही** | • पूर्वपद - उपसर्गात्मक अव्ययांपैकी असते. | **उदा.** : निष्कांचन - निर्गत (निघून गेले) आहे कांचन (सोने) ज्यापासून तो.<br>दुर्बल, विधवा |

## समासविषयक काही महत्त्वाच्या गोष्टी

(१) एकाच सामासिक शब्दाचे विग्रह वेगवेगळ्या प्रकारे करता येतात. अशा वेळी अर्थास अनुसरून विग्रह करावा व समास ठरवावा.

उदा. **असत्य -** नाही सत्य ते, सत्य नसलेला (नञ् तत्पुरुष).

**असत्य -** नाही सत्य ज्यात असे (भाषण) - (नञ् बहुव्रीही).

(२) समासातील पदे संस्कृतमधून आलेली (तत्सम) असतील, तर त्यांचा संधी करावा. जसे-

विद्या + अभ्यास = **विद्याभ्यास** तसेच जितेंद्रिय, लंबोदर. मराठीत शब्दांचा संधी करण्याकडे कल नसतो. जसे तोंड + ओळख = **तोंडओळख** तसेच नाउमेद, पैसाअडका इत्यादी.

(३) भिन्न भाषांतील समास टाळावा. उदा. **हेडशिक्षक, डाकगृह, गृहजावई, स्कूलगाडी** इत्यादी.

(४) सामासिक शब्दाचे लिंग व वचन हे शेवटच्या शब्दावरून ठरवितात व विभक्तीचे प्रत्यय शेवटच्या शब्दाला लावतात.

साखरभात (पुल्लिंग), पुरणपोळी (स्त्रीलिंग), डाळवांगे (नपुंसकलिंग), मावसबहिणी (अनेकवचन) मामेभावाचा (षष्ठी विभक्ती) इत्यादी.

(५) १) द्वंद्व व तत्पुरुष समास असलेले शब्द **नामे** किंवा **विशेषणे** असतात.

२) अव्ययीभाव समास असलेला शब्द **क्रियाविशेषणे** असतो.

३) बहुव्रीही समास असलेला शब्द **विशेषण** असतो.

## स्वयंअध्ययन

**पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**प्रश्न १)** पुढील सामासिक शब्दांचा विग्रह करून समासांची नावे खालील तक्त्यानुसार लिहा.

गोपाल, पंचक्रोशी, अभद्र, चंद्रमौली, अगाध, पांथस्थ, सुधाकर, अधम, निर्विकल्प, सुखद, शेषशायी, कुलोत्पन्न, भालचंद्र, त्र्यंबक, कार्यदक्ष, चरणांबुज, पुरुषोत्तम, मुखचंद्रमा, महात्मा, शीतलतनू, घननीळ, जगन्निवास, षडानन, बोबडगाणी, पानपत्रावळ, जरामरण, घडोघडी, मेंढवाडा इत्यादी.

| सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|

**प्रश्न २)** पुढे काही सामासिक शब्दांचे विग्रह दिलेले आहेत. त्यावरून मूळ सामासिक शब्द व समासाचा प्रकार कोणता ते लिहा.

(१) पाच आहेत मुखे ज्याला तो.
(२) पान, सुपारी व इतर पदार्थ.
(३) साखरेसारखे लिंबू.
(४) भाजी, भाकरी व त्याच प्रकारच्या वस्तू.
(५) दोनदा जन्मलेला. द्विगू समास
(६) पाच अमृतांचा समुदाय. द्विगू समास
(७) निसगनि निर्मिलेले.
(८) ज्याला क्षय नाही असा.
(९) मदाने अंध झालेला.
(१०) नखापासून शेंडीच्या टोकापर्यंत.
(११) शास्त्रात सांगितल्याप्रमाणे.

◆ ◆ ◆